# राष्ट्रीयसेवा योजना वार्षिक अहवाल २०२३-२४(डी-८५)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीयसेवा योजना यांच्यावतीने महाविद्यालय,सिडको नाशिक यास सन २०२३-२४ साठी ५० स्वयंसेवकांचे एकक मंजूर करण्यात आले आहे.राष्ट्रीय स्वयंसेवा योजना स्वयंसेवकांची नाव नोंदणी करून त्याच्यासाठी उद्बोधन वर्ग घेण्यात आला. स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजना बद्दल संपूर्ण माहिती देवून रा.से.यो.चे महत्व पटवून देण्यात आले.

**१)एप्रिल व मे २०२३-**एप्रिल महिण्यात १४ एप्रिल ला म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली व महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.१ मे म्हणजेच महाराष्ट्रदिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला.

**२)जून व जुलै २०२३-**२१ जून २०२३ रोजी कार्यक्रम अधिकारी शालिनी पेखळे आंतरराष्ट्रीय योगदिना निमित्त आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.समीर चव्हाण सर ६० विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे

योगा सेक्शन पार पडले. तसेच जून मध्ये आयोजित आषाढीवारी कॅम्प या कॅम्पसाठी रा.से.यो.चे विद्यार्थी प्रफुल्ल मेशराम व पांडूरंग सद्गिर हे विद्यार्थी पुणे ते पंढरपूर वारी कॅम्पला उपस्थित होते.

**३) ऑगस्ट व सप्टेंबर -**१४ ऑगस्ट २०२३ रोजी मराठा विद्याप्रसारक आयोजित स्वतंत्र ज्योत रॅली कार्यक्रम अधिकारी शालिनी पेखळे व इतर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तसेच राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रजासत्ताकदिन संचनल पूर्व विद्यापिठस्तरिय निवडचाचणी शिबिरात रा.से.यो. चे विद्यार्थि संकेत चव्हाण व अनघा सोनार यांनी सहभाग नोंदवला. २४सप्टेंबर २०२३ रोजी NSS दिवस साजरा करण्यात आला.

**४) ऑक्टोबर व नोव्हेंबर-** ऑक्टोबर महिन्यात महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. व महात्मा गांधीजींच्या जयंती निमित्ताने श्रमदान आयोजित करण्यात आले.

मेरी माटी मेरा देश या उपक्रमाअंतर्गत कार्यक्रम अधिकारी डॉ.शालिनी पेखळे यांच्या मार्गदर्शनाने संकेत चव्हाण यांनी

माती सोबत १५००सेल्फी जमा केली व ३१ऑक्टोबरला २०२३ दिल्ली येथे समारोह कार्यक्रमास उपस्थिती नोंदवली.

३१ऑक्टोबर २०२३ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला.

**५) डिसेंबर २०२३-** महाविद्यालयातील रा.से.यो.चा विद्यार्थी सार्थक ढोमसे यांनी २५डिसेंबर २०२३ रोजी गडचिरोली येथे होणाऱ्या आव्हान शिबिरास उपस्थित राहिले.तसेच महाविद्यालयात एड्स दीन जनजागृती निमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले.

**६) जानेवारी २०२४-** ३ जानेवारी २०२४ रोजी सावित्रीबाई फुले जयंती व महिला मुक्तिदिन तसेच बालिका दीन महाविद्यालयात साजरा करण्यात आला.

**७) फेब्रुवारी २०२४-** रा.से.यो. अंतर्गत हिवाळी शिबिर माडसांगवी गावात ३ फ्रेब्रुवरी ते ९ फेब्रुवारी २०२४ रोजी माडसांगावी गावात आयोजित करण्यात आले. तसेच या शिबिरात रा.से.यो. विद्यार्थी यांनी मतदान जनजागृती व बालहक्क या विषयावर गावात पथनाट्य करून जनजागृती केली. तसेच ऐतीहासिक स्थळांवर जावून स्वच्छता व वृक्षरोपण केले.२४ फेब्रुवारी २०२४ रोजी

ऐतीहासिक स्थळ कवनाई येथे स्वच्छता व तिथली माहिती जाणून घेतली.२७ फेब्रुवारी २०२४ रोजी नाशिक येथील सोमेश्वर मंदिर व बालाजी मंदिर येथे स्वच्छतेचा उपक्रम राबविण्यात आला.

**८) मार्च -** ८ मार्च २०२४ रोजी महीला दीन निमित्ताने डॉ. किर्ती शिंदे यांनी महीला कायदेविषयक मार्गदर्शन केले.


GPS Map Camera
Nashik, Maharashtra, India
2V2F+P8X, Madsangavi, Nashik, Maharashtra 422006, India
Lat 20.001977°
Long 73.873287°
07/02/24 12:28 PM GMT +05:30
Google




नामको हॉस्पिटल
NAVJEEVAN EDUCATION SOCIETY'S
NAVJEEVAN LAW COLLEGE, NASHIK
नवजीवन विधी महाविद्यालय,सिडको, नाशिक
उद्घाटन समारंभ


GPS Map Camera
Nashik, Maharashtra, India
CE-1-3-12, New Nashik, Shivshakti Nagar, Nashik, Maharashtra 422008, India
Lat 19.987036°
Long 73.754156°
05/10/23 01:37 PM GMT +05:30
Google


Regional Director of NSS Pune
Ministry of Youth Affairs and Sports, Government of India &
Department of Higher & Technical Education, Govt. of Maharashtra
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना


सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, राष्ट्रीय सेवा योजना
आणि जुन्नर पर्यटन विकास संस्था
'वैभवशाली जुन्नरचे पर्यटन'


राजे शिवछत्रपती सार्वजनिक
माडसांगवी ता.जि.नाशिक.
नामको हॉस्पिटल
GPS Map Camera
Nashik, Maharashtra, India
2V2F+P8X, Madsangavi, Nashik, Maharashtra 422006, India
Lat 20.001977°
Long 73.873287°
06/02/24 11:41 AM GMT +05:30
Google


NATIONAL


SUVICHAR
NATIONAL
FESTIVAL
VIKSIT BHARAT 2047
vivo Y100A


FOLK DANCE (GROUP)
NATIONAL
VIKSIT BHARAT 2047
FESTIVAL
2024
12-16 January, Nashik
vivo Y100A



12-16 January | Nashik, Mahara
WELCOME TO THE BIGGEST EXTRAVAGA
ORGANISER OF




SUVICHAR
27 NATIONAL YOUTH FESTIVAL
STATE SPORTS DAY


SUVICHAR
27 NATIONAL
VIKSIT BHARAT 2047
FESTIVAL
12-16 January, Nashik



पुढारी

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या हजार युवांची मदत

● युवा महोत्सवाची जोरात तयारी

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

येत्या १२ ते १६ जानेवारी रोजी शहरातील विविध ठिकाणी होत असलेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवात राष्ट्रीय सेवा योजनेच्या एक हजार युवांचा समावेश असणार आहे. यामध्ये सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या ६५ विद्यार्थी आणि १० ते १५ कार्यक्रम अधिकारी, युनिट हेड यांचा समावेश आहे. प्रामुख्याने नाशिकचे ५५ विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा समावेश यामध्ये आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे महाराष्ट्र आणि गोवा या केंद्राचे क्षेत्रीय संचालक अजय शिंदे, राज्य संपर्कप्रमुख नीलेश पाठक, यूथ ऑफिसर सुमंत यादव हे याबाबतचे नियोजन करत आहे.

देशभरातून या महोत्सवासाठी साडेसात ते आठ हजार युवा एकत्र येणार आहेत. या महोत्सवात २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश यातील प्रत्येकी १०० युवांचा चमू, राष्ट्रीय सेवा योजना युवा स्वयंसेवक, नेहरू युवा केंद्र संघटन युवा स्वयंसेवक असे सुमारे ८ हजार जण यात सहभागी होणार आहेत. १२ जानेवारीला या महोत्सवाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. नाशिक येथील तपोवन मैदानावर उद्घाटन समारंभ होणार आहे. महोत्सवांतर्गत सांस्कृतिक, कौशल्य विकास, युवा कृती असे स्पर्धात्मक कार्यक्रम होणार आहेत. त्यामध्ये समूह लोकनृत्य, लोकगीत, कथालेखन, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व, छायाचित्र, हस्तकला, वस्त्रोद्योग, कृषी उत्पादने यांचा समावेश असणार आहे.




महोत्सवासाठी करण्यात आलेल्या सुविचार समिती, यंग आर्टिस्ट समिती तसेच स्पर्धात्मक समितीमध्ये जिल्हा समन्वयक सदस्य म्हणून भूमिका बजावत आहेत. महोत्सव यशस्वीतेसाठी प्रत्येकाकडे वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. जिल्हा समन्वयकांमध्ये डॉ. रवींद्र अहिरे, डॉ. गोरक्षनाथ पिंगळे, डॉ. डी. के. आहिर तसेच महिला कार्यकारी अधिकारी म्हणून डॉ. भारती कोल्हे, डॉ. शालिनी पेखळे, संघनायक प्रा. उदय चौधरी आणि प्रा. मिलिंद ठाकरे यांचा समावेश आहे.

Nashik Edition
Jan 8, 2024 Page No. 8
newspaper.pudhari.co.in



## महत्त्वाचे



# विरुद्ध रक्तगट असताना 'पर्ल नाईन'मध्ये किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी!

**नाशिक :** उत्तर महाराष्ट्रातील आरोग्य सेवेत नाईन पर्ल्स हॉस्पिटलने अल्पावधीतच नावलौकिक मिळविला आहे. विरुद्ध रक्तगटाच्या किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याची माहिती हॉस्पिटलचे संचालक किडनी विकार व प्रत्यारोपणतज्ज्ञ डॉ. नागेश अघोर यांनी दिली. वर्षभरापासून नाईन पर्ल्स येथे डॉ. अघोर यांच्याकडे ओ निगेटिव्ह रक्तगटाचे रुग्ण (वय ४४) आपल्या दोन्ही किडन्या कायमच्या निकामी झाल्याने उपचार घेत होते. त्यादरम्यान त्यांचे डायलिसिसदेखील चालू होते. त्यावर रुग्णाला डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपण करण्याचा सल्ला दिला होता. रुग्णाचे आई-वडील वैद्यकीयदृष्ट्या शस्त्रक्रियेस योग्य नसल्याने आणि बहीण, भावाच्या वैयक्तिक कारणांमुळे त्यांची किडनी प्रत्यारोपित करणे शक्य नव्हते. रुग्णाच्या पत्नीने पतीला किडनी देण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र, तिचा रक्तगट 'बी पॉझिटिव्ह' होता. रक्तगट भिन्न असल्याने किडनी प्रत्यारोपणात अडचणी होत्या. त्यावर रुग्णाच्या पत्नीने पुढाकार घेऊन विरुद्ध रक्तगट असलेली किडनी पतीला देण्याचे ठरवले. डॉ. अघोर यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक चाचण्या व कायेदशीर प्रक्रिया पार पाडत शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली. शस्त्रक्रिया यशस्वितेसाठी संचालक किडनी विकार व प्रत्यारोपणतज्ज्ञ डॉ. नागेश अघोर, शल्यचिकित्सक डॉ. अमोलकुमार पाटील, डॉ. किशोर वाणी, भूलतज्ज्ञ डॉ. केतन ठोंबरे, डॉ. संदीप भंगाळे आदींचा समावेश होता. रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी नाईन पर्ल्स हॉस्पिटलचे संचालक डॉ. दिनेश वाघ ,डॉ. राजेंद्र देशमुख, डॉ. धनंजय डुबेरकर, डॉ. विनायक शेणगे, डॉ. शीतलकुमार हिरण, डॉ. योगेश चौधरी, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. हुसेन बोहरी व हॉस्पिटल केंद्रप्रमुख जॉन प्रिजू उपस्थित होते.

पुढारी

# किडनीदान करत पत्नीने दिले पतीला जीवदान

- प्राध्यापक पत्नीने निभावले अर्धांगिनीचे कर्तव्य

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

विवाह म्हणजे साताजन्मांची लग्नगाठ अशी भावना आजही भारतीय समाजात रूढ आहे. जन्मोजन्मी तोच पती मिळावा म्हणून आजच्या आधुनिक युगातही वटवृक्षाला फेऱ्या मारणाऱ्या महिला आपण पाहतो. मात्र, खरोखरीच पतीवर आलेल्या संकटाला परतवून लावण्यासाठी स्वत:च्या जिवाची पर्वा न करता सामोरे जाणाऱ्या सावित्री आपल्याला अपवादानेच दिसतात. अशाच एका सावित्रीने आपल्या पतीला किडनीदान करत जीवनदान दिल्याने खऱ्या अर्थाने तिने अर्धांगिनीचे कर्तव्य पार पाडल्याची भावना व्यक्त होत आहे.

मूळच्या माडसांगवी (ता. नाशिक) येथील असलेल्या प्रा. शालिनी पेखळे-घुमरे यांनी ऐन नवरात्रोत्सवात पतीला किडनीदान केल्याने जीवनदान मिळाले आहे. प्रा. पेखळे-घुमरे या नवजीवन विधी महाविद्यालयात प्राध्यापक असून, त्यांचे पती मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या नाशिक येथील विधी महाविद्यालयात प्राध्यापक आहेत. दोघेही मानधन तत्त्वावर असल्याचे त्यांची कौटुंबिक परिस्थिती साधारण आहे. त्यांच्या विवाहाला १५ वर्षे झाली असून, एक मुलगा आहे. सगळे सुरळीत सुरू असताना दीड वर्षापूर्वी प्रा. डॉ. मनोज पेखळे यांना किडनीचा त्रास असल्याचे निदान झाले. त्यातच मागील आठ महिन्यांपासून डायलिसिस सुरू असूनही दोन्ही किडन्या निकामी झाल्याने किडनी प्रत्यारोपणाचा सल्ला डॉक्टरांनी दिला होता. अशा परिस्थितीत खचलेल्या पतीला आणि कुटुंबाला सावरण्यासाठी प्रा. शालिनी यांनी पुढे येत किडनी देण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे त्यांची किडनी प्रा. डॉ. पेखळे यांना जुळल्याने त्यांना मोठे हायसे वाटले. त्यांची किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया नाइन पल्स हॉस्पिटल येथे डॉ. नागेश अघोर यांनी केली. यामुळे ऐन नवरात्रोत्सवात अर्धांगिनीच्या रूपाने दुर्गा धावून आल्याची भावना पेखळे कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

> एक स्त्री काय करू शकते, याची जाणीव यानिमित्ताने झाली. पतीला जीवनदान देण्याची शक्ती आणि संधी मला मिळाली. अवयवदानासाठी सर्वांनी पुढे येण्याची गरज आहे. त्यामुळे हताश झालेल्यांच्या जीवनात आशेचे किरण निर्माण होऊ शकते. त्यात आपला सहभाग आपण देऊ शकतो.
>
> **- प्रा. शालिनी पेखळे**



**नाशिक : किडनी प्रत्यारोपणानंतर पती प्रा. डॉ. मनोज यांच्या समवेत प्रा. शालिनी पेखळे.**

Nashik Edition
Oct 30, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in






